हुकूमनामा (1)

RCS-79/2026
विष्णु / भाग्यश्रीबाई
नि-11/अ

# मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, क .स्तर
# अंबाजोगाई यांचे न्यायालयात

दि.दा.क्र. 78 /२०२६

**वादी** :- **विष्णु पि. रंगनाथराव कदम,**
वय :- ५५ वर्षे, धंदा :- व्यापार,
रा. कुत्तर विहीर, दर्गा जवळ, अंबाजोगाई, जि.बीड.

**विरुध्द**

**प्रतिवादी** :-१) **भाग्यश्रीबाई भ्र. बालु जगताप,**
वय :- ७८ वर्षे, धंदा :- घरकाम,
रा. मु. कामखेडा, ता.रेणापूर, जि. लातूर.

२) **विजयमाला भ्र. प्रकाश फावडे,**
वय :- ६३ वर्षे, धंदा :- घरकाम,
रा. रविवार पेठ, बागवान गल्ली, अंबाजोगाई, जि. बीड.

**दावा :- मालकी घोषीत करून मिळणे बाबत.**

**वादी तर्फे खालीलप्रमाणे वादपत्र सादर.**

१) हे की, वादी व प्रतिवादी हे आपसात सख्खे भाऊ बहिण आहेत.

२) हे की, वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाची घर मिळकत मौजे कुत्तर विहीर, अंबाजोगाई येथील नगर परिषद हद्दीतील जुना घर क्र.२-२८५ चा नवीन घर क्र.२-३०४ क्षेत्रफळ २५ X २५ फुट ही घर मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. सदर मिळकतीला यापुढे दाव्यातील वादग्रस्त मिळकत म्हणून संबोधण्यात यावे. वादग्रस्त मिळकतीच्या चतु:सिमा पुढील प्रमाणे पूर्वेस :- ५ फुट रस्ता व त्यालगत काळदाते यांचे घर पश्चिमेस :- शिंदे यांचे घर, दक्षिणेस :- वादी यांची व त्यांच्या भावकीची एकत्रित वापरासाठी ठेवलेली खुली जागा, आणि उत्तरेस :- रस्ता या आहेत.

विष्णु कदम

३) हे की, वादी व प्रतिवादी हे हिंदू एकत्र कुटुंबाचे सदस्य असून वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वडीलांच्या मृत्युनंतर सन २०१५ मध्ये वडीलोपार्जित वादग्रस्त मिळकतीची तोंडी वाटणी झालेली होती. प्रतिवादी क्र.१ व २ यांचा विवाह झालेला असून त्या त्यांच्या सासरी नांदत असल्यामुळे त्यांनी वडीलोपार्जित मिळकतीतील त्यांचा हिस्सा वादी यांच्या हक्कात सोडला असल्यामुळे वादी यांना संपुर्ण घरजागा देण्यात आली होती. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या मधील तोंडी वाटणीनुसार वादग्रस्त मिळकतीतील वादी यांना वाटून आलेल्या संपुर्ण हिश्याचा ते उपभोग घेत होते व आहेत. परंतु वादग्रस्त मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे मयत वडील नामे रंगनाथ पि. राम कदम यांच्या नावे महसूल अभिलेखात (पी.टी.आर.उतारा) नोंद आहे.

४) हे की, वरील नमूद तोंडी वाटणी प्रमाणे वादी यांनी दि.०१/१२/२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांना मयत रंगनाथ राम कदम यांच्या नावे असलेल्या घरजागा वादी यांच्या नावे करण्याकरीता एकत्रितपणे अर्ज देऊन वादग्रस्त मिळकत वादी यांच्या नावे करून देण्याची विनंती केली असता, प्रतिवादी क्र.१ व २ यांनी एकत्रित अर्ज करण्याकरीता वादी यांना विरोध केला व वादी यांची मालकी नाकारली आहे. त्यामुळे वादी यांना प्रतिवादी यांचे विरूध्द दावा दाखल करण्याचे कारण घडले आहे. दि.०१/१२/२०२४ ही दावा निर्मितीची तारीख आहे.

५) हे की, वादी व प्रतिवादी यांची सरस निरस मानाने तोंडी वाटणी झालेली असून संपुर्ण वादग्रस्त मिळकत ही वादी यांच्या हिश्यास आलेली असून त्यावर वादी यांचा ताबा आहे. त्यामुळे वादी यांची मालकी घोषीत करून नमूद वादग्रस्त मिळकतीचे वादी हे मालक व कब्जेदार असल्याचे घोषीत करणे गरजेचे आहे. यासाठी लागणारी आवश्यक ती कोर्ट फिस वादी यांनी भरलेली आहे जी पुरेशी आहे.

रंगनाथ कदम

Rcs - 79/2026
विष्णु / भाग्यश्रीबाई
(3) नि. 11/अ



६) हे की, वादग्रस्त मिळकत ही अंबाजोगाई येथील असून मा. न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे. त्यामुळे मा. न्यायालयास सदरचा दावा चालविणे व निकाली काढण्याचे न्यायधीकरण क्षेत्र आहे.

## तरी विनंती की,

वादी यांचा दावा वादी यांच्या मागणीप्रमाणे डिक्री करण्यात यावा.

१) वादी हे दाव्यातील मुद्दा क्र.२ मधील नमूद वादग्रस्त मिळकतीचे मालक व कब्जेदार असल्याचे घोषीत करण्यात यावे.

२) वादी हे अन्या कोणत्या कायदेशीर मागणीचे हक्कदार असतील ती त्यांच्या हक्कात देण्यात यावी.

दिनांक :- २४/०२/२०२६

वादी

विष्णु कदम

**विष्णु पि.रंगनाथ कदम**

## सत्यपडताळणी

वरील दाव्यातील संपुर्ण मजकूर हा माझे सांगितले प्रमाणे नमूद केला असून तो खरा व बरोबर आहे. तो मी वाचून, समजून, उमजून त्यावर सह्या केल्या आहेत.

दिनांक :- २४/०२/२०२६

वादी

विष्णु कदम

**विष्णु पि.रंगनाथ कदम**

मार्फत

Gavane

**ॲड. विश्वास गं. बावणे**

Res - 79/2026
विष्णु / भाग्यश्रीबाई
नि : 11/35

(S)

# मा. दिवाणी न्यायाधीश साहेब, क .स्तर
# अंबाजोगाई यांचे न्यायालयात

Exh-10/B

नियमित दि.दा. क्र.७९/२०२६

विष्णु विरुध्द भाग्यश्रीबाई व इतर

**दावा :- मालकी घोषीत करून मिळणे बाबत.**

## समजपत्र/तडजोडपत्र

**सदरील प्रकरणात वादी व प्रतिवादी यांचे तर्फे खालीलप्रमाणे समजपत्र/तडजोडपत्र सादर करण्यात येत आहे.**

१) हे की, वादी व प्रतिवादी हे आपसात सख्खे भाऊ बहिण आहेत, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

२) हे की, वादी व प्रतिवादी यांच्या हिंदु एकत्र कुटुंबाची घर मिळकत मौजे कुत्तर विहीर, अंबाजोगाई येथील नगर परिषद हद्दीतील जुना घर क्र.२-२८५ चा नवीन घर क्र.२-३०४ क्षेत्रफळ २५ X २५ फुट ही घर मिळकत वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जित मिळकत आहे. वादग्रस्त मिळकतीच्या चतु:सिमा पुढील प्रमाणे पूर्वेस :- ५ फुट रस्ता व त्यालगत काळदाते यांचे घर पश्चिमेस :- शिंदे यांचे घर, दक्षिणेस :- वादी यांची व त्यांच्या भावकीची एकत्रित वापरासाठी ठेवलेली खुली जागा, आणि उत्तरेस :- रस्ता या आहेत. हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

३) हे की, वादी व प्रतिवादी हे हिंदु एकत्र कुटुंबाचे सदस्य असून वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये वडीलांच्या मृत्युनंतर सन २०१५ मध्ये वडीलोपार्जित वादग्रस्त मिळकतीची तोंडी वाटणी झालेली होती. प्रतिवादी क्र.१ व २ यांचा विवाह झालेला असून त्या त्यांच्या सासरी नांदत असल्यामुळे त्यांनी वडीलोपार्जित मिळकतीतील

विष्णु कदम

Thumb of Vijaymala.

Thumb of Bhagyashree

Thumb identified by me.
12/03/2026

त्यांचा हिस्सा वादी यांच्या हक्कात सोडला असल्यामुळे वादी यांना संपुर्ण घरजागा देण्यात आली होती. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या मधील तोंडी वाटणीनुसार वादग्रस्त मिळकतीतील वादी यांना वाटून आलेल्या संपुर्ण हिश्याचा ते उपभोग घेत होते व आहेत. परंतु वादग्रस्त मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे मयत वडील नामे रंगनाथ पि. राम कदम यांच्या नावे महसूल अभिलेखात (पी.टी.आर.उतारा) नोंद आहे हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

४) हे की, वादी व प्रतिवादी यांची सरस निरस मानाने तोंडी वाटणी झालेली असून संपुर्ण वादग्रस्त मिळकत ही वादी यांच्या हिश्यास आलेली असून त्यावर वादी यांचा ताबा आहे. त्यामुळे वादी यांची मालकी घोषीत करून नमूद वादग्रस्त मिळकतीचे वादी हे मालक व कब्जेदार असल्याचे घोषीत करणे गरजेचे आहे, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

**वादी व प्रतिवादी यांच्या तडजोडीप्रमाणे तसेच तथाकथित तोंडी वाटणी मध्ये ठरल्याप्रमाणे :-**

अ) वादी विष्णु पि. रंगनाथराव कदम यांच्या हिश्यास मौजे कुत्तर विहीर, अंबाजोगाई येथील नगर परिषद हद्दीतील जुना घर क्र.२-२८५ चा नवीन घर क्र.२-३०४ क्षेत्रफळ २५ X २५ फुट ही वडीलोपार्जित घर मिळकत वरील नमूद मुद्दा क्र.२ मधील चतु:सिमेच्या आतिल संपुर्ण घर जागा देण्यात आलेली आहे, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

ब) प्रतिवादी क्र.१ नामे भाग्यश्रीबाई भ्र. बालू जगताप (पूर्वाश्रमीचे नाव भागयश्रीबाई पि. रंगनाथ कदम) यांच्या हिश्यास तसेच प्रतिवादी क्र.२ नामे विजयमाला भ्र. प्रकाश फावडे (पूर्वाश्रीमीचे नाव विजयमाला पि. रंगनाथ कदम) या दोघीही स्वत:च्या सासरी सुखाने नांदत असून त्यांना दाव्यातील संपुर्ण वडीलोपार्जित मिळकतीतील कुठलाही हिस्सा नको असल्याने त्यांनी स्वखुशीने स्वत:चा कायदेशीर

I know defendant Thumb
12/03/20

विष्णु कदम

Thum of Vijaymala

Thum of Bhagyashreebai

RCS- 79/2026
विष्णु / भाग्यश्रीबाई
नि. 11/अ

(7)



हिस्सा वादी यांच्या हक्कात सोडून दिलेला होता. त्यामुळे वादी हेच संपुर्ण मिळकतीचे मालक व कब्जेदार आहेत, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

५) हे की, सदरील तडजोडपत्र/समजपत्र आधारे वर नमूद वडीलोपार्जित मिळकतीच्या झालेल्या तोंडी वाटणी प्रमाणे वादी हे स्वत:चे नाव महसूल अभिलेखात तसेच पी.टी.आर. उताऱ्यावर मालकी रकान्यात लावून घेतील. त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ या हरकत अडथळा तसेच वाद उपस्थित करणार नाही, हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

## तरी विनंती की,

वादी यांचा दावा समजपत्र/तडजोडपत्र आधारे निकाली काढण्यात यावा.

दिनांक :- १२/०३/२०२६

| प्रतिवादी | वादी |
| --- | --- |
| | विष्णु कदम |
| **१) भाग्यश्रीबाई भ्र. बालू जगताप** | **विष्णु पि.रंगनाथ कदम** |
| **२) विजयमाला भ्र. प्रकाश फावडे** | |
| मार्फत | मार्फत |
| Dehere | Bavane |
| **ॲड. छाया शे. देहरे** | **ॲड. विश्वास गं. बावणे** |

Thumb identified me.
12/03/2026

(9)

**ORDER BELOW EXH – 10 IN RCS NO. 79/2026**

Today the plaintiff and defendants are present along with their Ld. Advocates. The parties are duly identified by their respective Advocates. The parties have duly verified and admitted the contents of pursis and their signatures theirin to be true and correct. The compromise appears to be valid and volunatary. Hence, pursis is read and recorded.

Digitally signed by PRIYANKA JAYAPRAKASH LIGADE
Date: 2026.03.24 13:02:43 +0530

**Date :- 12/03/2026**

**Place :- Ambajogai**

**Priyanka J. Ligade**

**2nd Jt. Civil Judge Junior Division**

(11)

नियमीत दिवाणी दावा क. 79/2026
विष्णु / भाग्यश्रीबाई
नि. क. 11/अ

............... याने दाव्याच्या खर्चा बददल रक्कम रुपये .................................. आज तारखेपासून .................. .च्या तारखेपर्यंत त्यावर दरसाल दर शेकडा .................. या दराने होणा–या ........................व्याजासह...........................याजला दयावे

## खर्चाचा आकडा

| वादीला झालेला | | | | प्रतिवादीला झालेला | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रु | पैसे | | | रु | पैसे |
| 1 | फिर्याद अर्जास स्टॅम्प ... | 200 | 00 | 1 | वजावटीच्या किंवा विरुध्द दाव्यास स्टॅम्प ... | 00 | 00 |
| 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प ... | 10 | | 2 | मुखत्यारनाम्यास स्टॅम्प ... | 10 | 00 |
| 3 | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प ... एकूण पूढील बाजूवर दिलेली ... | | 00 | 3 | दाखल झालेल्या कागदास स्टॅम्प एकूण पूढील बाजूवर दिलेली ... | 00 | 00 |
| 4 | साक्षीदारास पोटगी ... | -- | 00 | 4 | साक्षीदारास पोटगी ... | 00 | 00 |
| 5 | फिर्यादीतील दाव्यावरील प्लीडराची फी विरुध्द दाव्यावरील प्लीडराची फी ... | 150 | 00 | 5 | प्लीडराची फी प्लीडराची फी विरुध्द दाव्यावरील | 150 | 00 |
| 6 | प्रोसेसी लागू करणे ... | 10 | 00 | 6 | प्रोसेसी लागू करणे ... | 00 | -- |
| 7 | कमिश्नरची फी ... | -- | -- | 7 | कमीश्नरची फी ... | -- | -- |
| 8 | भाषांतराची फी ... | -- | -- | 8 | भाषांतराची फी ... | -- | -- |
| 9 | नकला करण्याची फी ... | -- | -- | 9 | नकला करण्याची फी ... | -- | -- |
| 10 | तहकूबीबध्दल दिलेला .. | -- | -- | 10 | तहकुबीबद्दल दिलेला ... | -- | -- |
| 11 | वारस दाखल करण्याबघलच्या अर्जावरील स्टॅम्प | -- | -- | | | | |
| | एकूण ... | 370 | 00 | | एकूण ... | 160 | 00 |
| | न दिलेला खर्च | | | | न दिलेला खर्च | | |
| | फिर्याद अर्जावरील ... | -- | -- | -- | विरुध्द दाव्यावरील ... | -- | -- |
| | प्लीडराच्या फीवरील ... | -- | -- | -- | प्लीडराच्या फीवरील ... | -- | -- |
| | प्रोसेसीवरील ... | -- | -- | -- | प्रोसेसीवरील ... | -- | -- |
| | दाखल झालेल्या कागदावरील (पुढील बाजूवर पहा ) | | | | दाखल झालेल्या कागदावरील(पुढील बाजूवर पहा ) | | 00 |
| | बाकी ... | 370 | 00 | | बाकी ... | 160 | 00 |

कारकून

वादिचे वकील. ॲड. व्ही.जी.बावने
प्रतिवादी वकील. ॲड.सी.एस.देहरे

आज तारीख 25 माहे 03 सन 2026
रोजी आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी

26.03.2026

( प्रियंका ज.लिंगाडे )
2 रे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
अंबाजोगाई

(हया मूकदम्यातील पक्षकारांना अशी ताकीद देण्यात येते की, त्यांनी हजर केलेले कोणतेही दस्तऐवज जर ते (परत) नेले नसते तर अपील झाले असल्यास अपीलाचा निकाल झाल्यावर नाश करुन टाकण्यास पात्र होतील)

नियमीत दिवाणी दावा क्र. 79/2026
विष्णु / भाग्यश्रीबाई
नि. क्र. 11/अ

| वादीकडून | | | | प्रतिवादीकडून | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु | पैसे | | | रु | पैसे | |
| दिलेला खर्च | -- | -- | -- | दिलेला खर्च | -- | -- | -- |
| दाखल झालेले कागद नंबर | -- | -- | -- | दाखल झालेले कागद नंबर | -- | -- | -- |
| नि | -- | | -- | | -- | | -- |
| न दिलेला खर्च | | -- | -- | न दिलेला खर्च | -- | -- | -- |
| दाखल झालेले कागद नंबर<br>नि. 4<br>10 | -- | -- | -- | दाखल झालेले कागद नंबर | | -- | -- |
| एकूण | 00 | -- | -- | एकूण | ०० | -- | -- |

(13)

नियमीत दिवाणी दावा क. 79 / 2026
विष्णु / भाग्यश्रीबाई
नि. क. 11 / अ

आज दिनांक १२ माहे ०३ सन २०२६ रोजी श्रीमती प्रियंका ज.लिगाडे. २रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, अंबाजोगाई यांच्यासमोर, वादी तर्फे ॲड. व्ही.जी.बावने प्रतिवादी तर्फे सी.एस.देहरे यांच्या समक्ष अखेर मुकादमा निकाली निघाला असुन असा हुकूम होतो की,

## ORDER

01. The Sut is disposed off in view of compromise pursis vide Exh- 10.
02. Compromise Decree be drawn in terms of pursis vide Exh-10.
02. Decree fee be refunded as per rules.
03. Copy of this order along with a memorandum describing property be sent to the concern registering officer as per Section 89-A of the Registration Act,1908.

सही/-

दिनांक:- २५/०३/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर
अंबाजोगाई